महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोगावरील अस्थायी पदांना मुदत वाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीबीसी-१०/२००६/प्र.क्र. ५७६ / मावक
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२.
दिनांकः ०७ नोव्हेंबर, २०१७

वाचाः-

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय विभाग व विशेष सहाय्य विभाग, क्रमांकः-रामाअ-००३/ प्र.क्र.१७५/मावक-१ दि.१ मार्च, २००५.

२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक-सीबीसी१०-२००६/ प्र.क्र.५७६/ मावक ५, दि. २ डिंसेबर,२००६

३) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांकः- सीबीसी-१०/ २००६/ प्र.क्र.५७६/मावक, दि. १७ फेब्रुवारी, २०१७ व शुध्दिपत्रक समक्रमांक दि. ०१ जून, २०१७

४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक /पदनि-२०१६/प्र.क्र ०८/आपुक, दि. ०३ ऑक्टोबर, २०१७

प्रस्तावनाः-

अनुसुचित जाती जमातीच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय सद्यःस्थितीचा अभ्यास करून शासनास उपाययोजना सूचविण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या दि.१/३/२००५ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र अनुसुचित जाती जमाती आयोगाची स्थापना करण्यात आली. सदर आयोगावरील अध्यक्षांबरोबरच आयोगाची मुदत दिनांक ३० जुन, २००९ रोजी संपुष्टात येणार होती. तथापि सदर आयोगामार्फत शासनास काही अहवाल सादर करावयाचे असल्याने सदर आयोगावरील पदांना संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये ०१ मार्च, २०१७ ते ३० सप्टेंबर, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सद्यःस्थितीत संदर्भाधीन क्र. ४ वित्त विभागाच्या शासन निर्णयास अनुसरून दि. ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत सदर अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

राज्य अनुसुचित जाती जमाती आयोगाकरीता अधिकारी/ कर्मचारी वर्गाची मंजूर ५३ पदापैकी विवरणपत्रात दर्शवलेली २७ पदे प्रथम टप्प्यात भरण्यास दिनांक २ डिसेंबर २००६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर एकूण २७ अस्थायी पदांना दि. ०१ मार्च, २०१७ ते दि. ३० सप्टेंबर, २०१७ पर्यत किंवा शासनाने पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत पुढे चालू ठेवण्यास संदर्भ क्र. ०३ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. आता आयोगाच्या सदर २७ अस्थायी पदांना दि. ०१ ऑक्टोंबर, २०१७ ते दि. ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत जे आधी घडेल तोपर्यंत पुढे चालू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. या पदावरील येणारा खर्च सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पित तरतुदीमधून मागणी क्रमांक एन-३ , २२२५-अनुसुचित जाती जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण ०१ अनुसुचित जातीचे कल्याण, ८०० इतर खर्च (०१) (०३) महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती आयोग (२२२५-४०७-१) या लेखाशिर्षातर्गत भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.०८/आपुक,दि. ०३ ऑक्टोबर, २०१७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक क्र. २०१७११०९१३३०४०९३२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Siddharth Amrutrao Zalte

Digitally signed by Siddharth Amrutrao Zalte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=dc54b49c6f5c903027053476b3a6ef50b46ff44a7e8b820fef7bfdd100c56194, cn=Siddharth Amrutrao Zalte
Date: 2017.11.09 13:19:57 +05'30'

(सि. अ. झाल्टे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, वरळी सी, फेस, मुंबई ४०० ०१८
२) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, वरळी, सी, फेस, मुंबई ४०००१८
३) वरीष्ठ संशोधन अधिकारी, महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, वरळी सी, फेस, मुंबई ४०००१८
४) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेता / लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७) निवासी व लेखा अधिकारी, मुंबई
८) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
९) निवड निस्ती /मावक.

विवरणपत्र

शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१०/ २००६/प्र.क्र.५७६/मावक

दि. ०७ नोव्हेंबर, २०१७

अ.क्र.	पदनाम	अस्थायी पदांची संख्या	वेतनश्रेणी (रूपये)
१.	सदस्य सचिव (सहसचिव दर्जा)	१	१५६००-३९१००
२.	सह संचालक (उप सचिव दर्जा)	१	१५६००-३१९००
३.	अतिरिक्त पोलीस अधिक्षक	१	१५६००-३१९००
४.	वरीष्ठ संशोधन अधिकारी	१	१५६००-३१९००
५.	पोलिस निरिक्षक	२	९३००-३९१००
६.	स्वीय सहाय्यक	१	९३००-३४८००
७.	संशोधन सहाय्यक	२	९३००-३४८००
८.	लघुलेखक उच्चश्रेणी	२	९३००-३४८००
९.	कार्यालयीन अधिक्षक	१	९३००-३४८००
१०.	सांख्याकी अधिकारी	१	९३००-३४८००
११.	सहाय्यक लेखा अधिकारी	१	९३००३४८००
१२.	सहाय्यक (विधी)	१	९३००-३४८००
१३.	लघुलेखक (निम्नश्रेणी)	१	९३००-३४८००
१४.	वरीष्ठ सहाय्यक	२	५२००-२०२००
१५.	लिपिक टंकलेखक	२	५२००-२०२००
१६.	बिल लिपिक	१	५२००-२०२००
१७.	वाहन चालक (कंत्राटी)	२	५२००-२०२००
१८.	शिपाई	४	४४४०-७४४०
	एकूण	२७	------------